


सत्यमेव जयते

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेटंर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


जा.क्र./आर्टी/योजना/JEE/NEET/२०२६-२७/ दिनांक: २१/०७/२०२६

# जेईई (JEE) व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांकरिता समुपदेशन पोर्टल (Counseling Portal) मुदतवाढ बाबत

## महत्वाची सूचना

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) मुंबई मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी २५० व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी २५० विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता आर्टी मार्फत दि. १८/०५/२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे आर्टी मार्फत दिनांक ०७/०८/२०२६ रोजी प्रथम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उमेदवारांनी त्यांच्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरीता पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. सदर पोर्टल दिनांक- ०८/०७/२०२६ पासून दिनांक –२०/०७/२०२६ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले आहे. तथापि सदर घोषणापत्रकाद्वारे **दि. ३१/०७/२०२६ पर्यंत विद्यार्थ्यांना पसंतीची प्रशिक्षण केंद्र निवड करण्याकरिता मुदतवाढ** देण्यात येत आहे. त्यानंतर कोणत्याही स्वरूपात मुदतवाढ देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

संस्था निवड विकल्प लिंक - https://jeeneet.arti.org.in/

स्वाक्षरी/-

(सुनिल वारे)

**व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) मुंबई**